## एम.बी.मोरे धाटाव रोहा येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

एम.बी.मोरे संचलित इंग्लिश मिडीअम स्कूल, कनिष्ठ व वरिष्ठ महिला महाविद्यालय धाटाव , रोहा येथे शनिवार, दि.०४.०१.२०२० रोजी वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले.

संस्थेचे संस्थापक मा.श्री. विजयराव मोरे तसेच रोठ बुद्रुक गावचे सरपंच सौ.कल्पिता साळुंखे, एल्पि कंपनीचे सिनिअर मॅनेजर व एम.बी.मोरे फाऊंडेशन संस्थेचे सहसचिव श्री. रविंद्र भोसले, उदयोजक श्री.बापूशेठ लिंबोरे , एम.बी.मोरे फाऊंडेशन संस्थेचे संचालक श्री.अशोकराव मोरे , ग्रामपंचायत धाटावचे उपसरपंच श्री.यशवंत रटाटे , बॅंक ऑफ इंडिया धाटावचे मॅनेजर श्री. चित्तरंजन कुमार , उदयोजक श्री. अनिल गावंड, धाटाव ग्रामस्थ श्री.संतोष रटाटे , श्री.हनुमंत ढवळे (माजी प्राचार्य), इंग्लिश मिडीअम स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ.कीर्ती धनवी, या सह पालक प्रतिनिधी व विद्यार्थी प्रतिनिधी वर्ग उपस्थित होते.

महिला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.प्रसन्न म्हसळकर यांनी आपल्या प्रस्ताविकात वार्षिक आढावा घेतल्यानंतर संस्थेचे उद्देश आणि पुढील यशस्वी वाटचालीबद्दल काही विशेष मुद्दे विषद केले. तसेच इंग्लिश मिडीअम स्कूलच्या मुख्याध्यापिका कु.कीर्ती धनवी यांनी ही आपल्या शाळेचा वार्षिक अहवाल सादर करून पुढील यशस्वी वाटचाली बद्दल विशेष मुद्दे मांडले.

कार्यक्रमात कु.मनाली खैर या विद्यार्थीनीचा विशेष सत्कार करून गौरविण्यात आले तसेच सर्व आजी व माजी विदयार्थी जे मागील शैक्षणिक वर्षात प्रथम आले त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी कलागुणदर्शन व सांस्कृती गुणांचे कलाप्रदर्शन झाले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन माधुरी जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन दिपेश भोसले यांनी केले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी या कार्यक्रमात मोलाची साथ दिली.

Scanned by CamScanner